जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

शुक्रवार दि.१३ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# ७० वर्षांवरील सर्वांना मिळेल आयुष्मान योजनेचा लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्र सरकारने बुधवारी (११ सप्टेंबर) मोठी घोषणा केली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, आता आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेत ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व लोकांना समाविष्ट केले जाईल. मोदी मंत्रिमंडळाने या निर्णयाला मंजुरी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीपूर्वी प्रसिद्ध झालेल्या भाजपच्या जाहीरनाम्यात असे म्हटले आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार घेता येणार आहेत. यामध्ये देशातील सुमारे ४.५ कोटी कुटुंबांचा समावेश असेल.केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की या योजनेसाठी सुरुवातीला ३,४३७ कोटी रुपये खर्च केले जातील. जसजसे लोक या योजनेत सामील होतील तसतशी त्याची व्याप्तीही वाढवली जाईल.सरकारने म्हटले आहे की ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे सर्व ज्येष्ठ नागरिक, त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता, या लाभाचा लाभ घेऊ शकतील. त्यांच्यासाठी नवीन स्वतंत्र कार्ड देण्यात येणार आहे. यामुळे त्यांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार करता येणार आहेत. आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी विमा योजना आहे, जी सध्या देशातील सर्वात गरीब ४० टक्के लोकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार प्रदान करते.राष्ट्रीय आरोग्य धोरणांतर्गत केंद्र सरकारने २०१७ मध्ये ही योजना सुरू केली. मात्र, पश्चिम बंगालसह अनेक राज्ये ही योजना स्वीकारण्यास नकार देत आहेत आणि राज्यात स्वत:च्या योजना चालवत आहेत.या योजनेअंतर्गत देशभरातील निवडक सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करता येतात. या योजनेंतर्गत प्रवेशाच्या १० दिवस आधी आणि नंतरचा खर्च भरण्याचीही तरतूद आहे.आयुष्मान योजनेंतर्गत जुनाट आजारांचाही समावेश होतो. कोणत्याही आजारासाठी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च कव्हर केला जातो. यामध्ये वाहतुकीवरील खर्चाचा समावेश होतो. यामध्ये सर्व वैद्यकीय चाचण्या, ऑपरेशन्स, उपचार इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत ५.५ कोटींहून अधिक लोकांनी उपचार घेतले आहेत.




## महोगुणी वृक्ष लागवडीस मंजूरी असताना पिटीओ बोडके कामात दिरंगाई करत असल्याने अमोल आतनुरे ने दिला आत्मदहनाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

अमोल आनंदा आतनुरे रा.सिरसी बु.ता.कंधार येथील शेतकरी असून महोगुणी वृक्ष लागवडी करिता ३ एक्कर साठी महोगुणी वृक्ष लागवडीसाठी चा प्रस्ताव सादर केलेला होता. प्रस्तावासोबत ७/१२,८ अ, जॉब कार्ड सर्व कागदपत्र दिले आहेत.

तो प्रस्ताव पंचायत समिती ने मंजूर केलेला आहे. पंचायत समिती कंधार येथे मी पुढील काम चालू करा, अशी मागणी करत आहे. परंतु तेथील मनरेगा विभागातील तांत्रिक कर्मचारी बोडखे यांनी अंदाजपत्रक बनवले नाही महोगुनी कृषी विभागाकडून करा अशी खोटी व दिशा भूल करणारी माहिती सतत देऊन मानसिक त्रास देत आहे माझं काम मंजूर असताना, संबंधित झढज जानुन बुजून कामात दिरंगाई करत आहे.

वृक्ष लागवड योजनेच्या सर्व पात्रता नियमात असताना, आजपर्यंत माझा प्रस्ताव मंजूर झालेला आहे, वर्ककोड काढलेला आहे, परंतु एस्टिमेट, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, दिली नसल्यामुळे माझे म्होगुनी वृक्ष लागावड च प्रशासकीय कामकाज झालेत नाही. त्यामुळे माझ आर्थिक, मानसिक नुकसान झाल आहे. संबंधित सर्व प्रकरणाची सविस्तर चौकशी करून माझ काम सुरु करून दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी वरील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई न केल्यास मी १७ सप्टेंबर रोजी पंचायत समिती कंधार येथे आत्मदहन करणार आहे. माझ्या मृत्यूस संबंधित कर्मचारी झढज बोडखे याना जबाबदार धरावे, असे अमोल आनंदा आतनुरे यांनी निवेदनाच्या प्रति देऊन मा राज्यपाल माहाराष्ट्र राज्य ,मा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,उपमुख्यमंत्री माहाराष्ट्र राज्य ,मा ग्रामविकास मंत्री माहाराष्ट्र राज्य ,मा कि. घो निकम अवर सचिव मंत्रालय मुबई ,आयुक्त नरेगा नागपूर उपायुक्त मनरेगा, आयुक्त संभाजीनगर, उपजिल्हाधिकारी नरेगा यांना कळविले आहे.

## शिवछत्र मित्र मंडळाच्या वतीने आठवड्यात एक दिवस जनता दरबाराला उस्फुर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

लोणार -मागील ३० वर्षा पासून लोणार शहरात कार्यरत असलेली सामाजिक संघटना शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या संकल्पनेतून जनता दरबाराच्या माध्यमातुन आठवड्यातून एक दिवस सर्वसामन्याना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळत आहे




आठवड्यातील दर गुरुवारी श्री टॉकीज येथील शिवछत्र मित्र मंडळाच्या कार्यलयात जनता दरबाराच्या माध्यमातुन गोरगरीब जनतेच्या, शेतकरी, तसेच प्रत्येक नागरिकांच्या अडीअडचणी जाणून त्यांचे निराकरण करण्यात येत आहे. अनेक शासकीय कार्यलयात सर्वसामान्य नागरिकांचे कामे मार्गी लागत नसल्याच्या तक्रारी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या कडे येत असल्यामुळे नागरिकांच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी फक्त समाजकारण हा एकमेव उद्देश डोळ्या समोर ठेऊन या जनता दरबाचे आयोजण करण्यात आले आहे. ज्या काही समस्या असतील त्या जनता दरबाराच्या माध्यमातून मार्गी लावल्या जात आहे.या कार्योचे शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांचे मुळे सर्व स्तरातील नागरीकांचे कामे पूर्ण होत आहेत हे विशेष

## रायगड जिल्ह्यातील धाटाव एमआयडीसीत भीषण स्फोट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रायगड (वृत्तसंस्था)**

रायगड येथील धाटाव एमआयडीसीत मोठा स्फोट झाल्याने तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा स्फोट धाटाव एमआयडीसी येथील एका केमिकल कंपनीत झाला असून या स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की एक किलोमीटर पर्यंत याचा आवाज ऐकू असल्याचे स्थानिकांकडून समजते. या स्फोटामुळे धाटाव एमआयडीसी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.धाटाव येथील एमआयडीसी परिसरात झालेल्या या स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. या ठिकाणी झालेल्या ढीगरा उपसून बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. साधना नायट्रो नामक कंपनीत हा स्फोट झाला असल्याचे समोर आले आहे. हा स्फोट सकाळी ११ च्या सुमारास झाला होता.धाटाव एमआयडीसी येथील प्लॉट क्रमांक ४७ येथील साधना नायट्रोकेम लिमिटेड कंपनीत हा स्फोट झाला आहे. कंपनीतील ओबीडी२ केमिकल प्लांटमध्ये ओबीडी२ प्रॉडक्ट वॉशिंग करण्यासाठी असलेल्या मेथनॉल केमिकलच्या स्टोरेज टँकवर फॅब्रिकेटर्सचे ६ कामगार वेल्डिंगचं काम करत होते. ते कामगार वेल्डिंगचं काम करत असताना मिथेनॉल केमिकल टँकचा ब्लास्ट होऊन त्यात हे सहा कामगार जखमी झाले आहेत. त्यापैकी तीन कामगारांचा मृत्यू झाला आहे, तर तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

## चारोळी

सुखाचे क्षण वेचत जा
दु:ख मात्र हसरे करून पहा
येतच राहतात वेगळ्या वाटा
अनुभवातून वेगळं शिकत रहा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## श्रीगोंदा तालुक्यात भानगाव शिवारात विजेच्या तिव्र धक्क्याने तरुणाचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्यातील भानगाव शिवारातील एका २४ वर्षीय तरुणाचा विजेच्या धक्क्याने गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी १० सुमारास घडली. आप्पासाहेब भाऊसाहेब थोरात वय २४ असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



याबाबत पोलिस ठाण्यात दिलेल्या नोंदीनुसार श्रीगोंदा तालुक्यातील भानगाव येथील विजेची कामे करत असलेल्या आप्पासाहेब भाऊसाहेब थोरात या खाजगी तरुणाला मंगळवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास गावातील रोहित्र खराब झाल्याने काम करण्यास बोलाविले मात्र यावेळी पुरेशी काळजी न घेतल्याने आप्पासाहेब थोरात याला विजेचा जबर धक्का बसला . या धक्क्यात तरुण गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर त्याचे सोबत असणारे सर्वजण तिथून पळून गेल्याने नातेवाईकांनी आप्पासाहेब थोरात यांचा घात झाला असल्याचा आरोप करत आरोपीवर गुन्हा दाखल करून अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका घेतली होती मात्र पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी परिस्थिती काळजीपूर्वक हाताळत नातेवाईकांना लवकरात लवकर तपास करून या प्रकरणातील आरोपींवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची हमी दिल्याने नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेत अंत्यसंस्कार केला या तरुणाच्या निधनाने संपूर्ण भानगाव परीसरात शोककळा पसरली आहे व हळहळ व्यक्त होत आहे

## पोलीस हेडकॉन्स्टेबल श्यामसुंदर भवानगीरकर यांची सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदी पदोन्नती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल श्यामसुंदर भवानगीरकर यांची पोलीस हेडकॉन्स्टेबल पदावरून सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने त्यांचे रामतीर्थ पोलीस ठाण्याचे साहय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले आहे.



बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत असलेले कर्तव्यनिष्ठ पोलीस हेडकॉन्स्टेबल श्यामसुंदर भवानगीरकर यांची पोलीस हेडकॉन्स्टेबल या पदावरून ते कार्यरत असलेल्या रामतीर्थ येथील पोलीस ठाण्यातच सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याचे ९ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे पत्र प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने त्यांना सहा. पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती बहाल करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांचे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप, पोलीस हेडकॉन्स्टेबल दशरथ जांभळीकर सह रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते माधव दादा वाघमारे, पत्रकार काशिनाथ वाघमारे पत्रकार विलास शेरे यासह अनेकांनी अभिनंदन केले.

## गौरी–गणपती उत्सवानिमित्त कंधार तालुक्यात आनंदाचा शिधा कधी मिळणार

### कंधार तालुक्यातील शिधा पत्रिकाधारक प्रतिक्षेत

**शासकीय गोदामामध्ये गौरी गणपती उत्सवानिमित्तचे आनंदाचे शिधा अध्यापही पोहचू शकाल नाही,शासकीय गोदामात कधी येणार ? स्वस्तधान्य दुकानदारांना कधी मिळणार ? वितरण प्रणाली कधी चालू करणार ? अशी चर्चा शिधापत्रिकाधारक कडून होत आहे.**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यात आनंदाचा शिधा कधी मिळणार शिधा पत्रिकाधारक शिधेच्या प्रतिक्षेत आहेत, राज्य सरकारच्या वतीने गोर-गरिबांचा सण उत्सव गोड व्हावा,

सदर गेल्या वर्षी प्रमाणे यावर्षी पण दिवाळी गौरी गणपती उत्सवानिमित्त राज्यातील शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' देऊन सामान्य लोकांचे तोंड गोड करण्याचा निर्णय घेतला होता.ह्या शिधा वाटपाची प्रकिया हे दि.१५ ऑगस्ट पासून ते १५ सप्टेंबर पर्यंत वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण होणार होती,पण अध्यापही आनंदाचा शिधा शासकीय गोदामत पोहचले नाही,त्यांच्यामुळे तालुक्यात शिधापत्रिका धारकांना गौरी गणपतीला मिळणारा शिधा पासून वंचित राहणाची वेळ आली आहे.

सामान्य गोरगरीब जनतेचे सण उत्सव गोड-व्हावे यासाठी शासनाने शिधापत्रिका धारकांना १००/- रुपयांत १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर तेल देण्याचा निर्णय घेतला. महागाईच्या काळात जगणं मुश्किल होत,असताना या आनंदाच्या शिद्यामुळे लोकांना तेवढाच दिलासा मिळणार होते,पण शासनाच्या ढिसाळ नियोजनमुळे कंधार तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना वंचित राहण्याची वेळ येते की काय असे परिस्थिती सध्या तरी दिसत आहे.

तालुक्यातील अंत्योदय कार्डधारक,केशरी रेशनकार्डधारक आहेत.या सर्वांना ई- पॉस'द्वारे शिधा वितरित केला जाणार होते.गेल्या वर्षी गुढी पाडव्याला हा शिधा वेळेवर पोहचू शकले नाही,जवळपास महिन्या नंतर आनंदाचा शिधा मिळाला होता. प्रत्येक वेळेस शासनाच्या चुकीच्या नियोजनमुळे कार्ड धारकांना आनंदाच्या शिधा पासून १ ते २ महिने वंचित राहावे लागत आहे. तरी गौरी गणपतीनिमित्त आनंदाचा शिधा वेळेवर लोकांना मिळणार कधी असा प्रश्न शिधापत्रिकाधारकांना पडला आहे.

तालुक्यातील सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा' वितरित कधी करणार शासनाच्या घोषणाना शिधापत्रिकाधारकांचे गोड-तोंड होणार आहे. म्हूणन उत्सवता होते. यावेळेस तरी वेळेवर शिधा मिळणार अशी कार्ड धारकांमध्ये बोलले जात होते,पण शेवटी शासन्याच्या चुकीच्या नियोजनाचे कार्डधारक वंचित राहण्याची वेळ आले आहे.

# लोहा –कंधार मध्ये मशाल पेटणार एकनाथ दादा पवार यांना विधानसभेत पाठवणार शिवसेना नेते खा.संजय राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | विशाल घंटे**

कंधारचा आमदार हा शिवसेनेचा होणार व मशाल पेटणार असे प्रतिपादन शिवसेना नेते खा.संजय राऊत यांनी लोहा येथे शिवसंवाद मेळाव्यात केले.लोहा येथील राधाई मंगल कार्यालयात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसंवाद मेळाव्याचे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या शिवसंवाद मेळाव्यास प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला असुन लोहा व कंधार तालुक्यातील हजारो शिवसैनिक, नागरिक,शेतकरी कष्टकरी, महिला भगिनींनी उपस्थित होत्या.

यावेळी शिवसेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, कार्यक्रमांचे आयोजक तथा शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार, माजी आमदार अनुसयाबाई खेडकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा जनाबाई नाकाडे,, जिल्हाप्रमुख माधवराव पावडे,ॲड मुक्तेश्वर धोंडगे, भुजंगराव पाटील,साहेबराव पाटील काळे,शिवसेनेचे लोहा –कंधार विधानसभा प्रमुख भाऊसाहेब पाटील कदम, लोहा तालुकाप्रमुख संजय पाटील ढेपे, कंधार तालुकाप्रमुख सचिन पेटकर, युवा सेनेचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील नंदनवनकर,,लोहा शहरप्रमुख खंडू पाटील पवार, , रुद्रा पाटील भोस्कर, आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना शिवसेना नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, लो ह्यात शिवसंवाद मेळावा आहे मी बऱ्याच शिव संवाद मेळाव्यास उपस्थित राहिलो.ज्या मतदार संघात शिवसेनेचा आमदार नाही तेथे आम्हाला शिवसेनेचा आमदार निवडून आणायचा आहे. लोहा –कंधारच नाहीतर संपूर्ण मराठवाडा भगवामय झाल्याशिवाय राहणार नाही.मराठवाड्ययाला उजेडात आणायचे आहे एकनाथ दादा पवार तुम्हाला तुमच्या मेहनीतीचे फळ मिळेल. एकनाथ दादा पवार यांनी ३५ वर्ष भाजपात काम केले व ते एक वर्षापासून शिवसेनेत काम करीत आहेत त्यांना भाजपा पेक्षा शिवसेना चांगली वाटते. येथे शिवसेनेत मायेचा ओलावा आहे. देशासाठी, राज्यासाठी, जनतेसाठी भाजपाची भूमीका स्वार्थी आहे.खोटे बोलण्याची आहे. भाजपाला राज्यात पोस्टर चिटकावयला माणूस नव्हता . शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना सोबत घेतले. पण भाजपाचे काम हे काम सैरो वैद्य मरो असे आहे. शिवसेना स्थापनेनंतर १८० सेना स्थापन झाल्या व आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची १८१ वी सेना आहे. पण आता देशात दोनच सेना शिल्लक आहेत एक देशाच्या सिमेवरील सैनिकांची सैना व एक शिवसेना . लोहा –कंधार मध्ये रस्ते नाहीत,पाणी नाही. येथील पिढी ही निझामासोबत लढली पण येथे विकास झाला नाही. सध्याचा आमदार व पुर्वीचा आमदार हा खोकेवाला



आहे. आता विकासासाठी लोहा –कंधारसह राज्यात मशालीचा यज्ञ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली यज्ञ पेटविला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा राज्यात कुठेच कोसळला नाही पण राजकोट येथे कोसळला आहे . साडेपाच ते दहा कोटी रुपये खर्चून हा पुतळा समुद्रापासी उभा केला तो कोसळला. पंतप्रधान नरेंद्र मोदी माफी मागतात त्यांना लाज वाटली पाहिजे. तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने मते मागता येताता पण चांगले पुतळे करता येत नाहीत. येथे अनेक लाडक्या बहिणी आहेत. त्यांना तुम्ही जे दीड हजार रुपये देता ते जनतेचे आहेत जनतेने भरलेल्या करातील आहेत. लाडक्या बहिणीला दीड हजार रुपये देता व आमदारांना ५० कोटी १०० कोटी देता मताला. आमचे सरकार आल्यावर लाडक्या बहिणीला दीड हजारच काय आम्ही तीन हजार रुपये देऊत. यावेळेला लोहा –कंधार सहित राज्यात शिवसेना महाविकास आघाडीचे १८० आमदार निवडून येतील लोहा –कंधार मध्ये मशाल पेटेल असे असे शिवसेना नेते खासदार संजय राऊत म्हणाले.

> **“ तसेच यावेळी बोलताना शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार म्हणाले की, भल्या भल्याना पाणी पाजविणारे शिवसेनेचा ढाण्या वाघ खा. संजय राऊत या मतदार संघाला १९९५ ची शिवसेना करुन जातील. येथे स्वातंत्र्याच्या ७८ वर्षात रस्ता झाला नाही, पिण्याचे पाणी नाही. येथील शेतकरी आत्महत्या करीत आहेत . येथे नेतृत्व करणाऱ्यांनी कलंबर साखर कारखाना, भूविकास बॅंक विकून खाली, एकनाथ पवार पुण्याचा नाही लोहयाचा आहे. पुण्याला पोट भरायला गेलो. मी पोट भरायला राजकारण करीत नाही. येथील चित्र बदलण्यासाठी काम करतो. येथील लोक शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना विठ्ठल रुक्मिणी सारखे पुजतात. येथे शिवसेनेची मशाल पेटवायची आहे**

## कलेक्टर साहेब थोड इकडे पण लक्ष द्याल का

# रजिस्टरी ऑफिस वादग्रस्त गटांच्या रजिस्ट्या कोणत्या आधारे करत आहे; जनतेला पडला प्रश्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

धर्माबाद हे शहर एक व्यापारी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे पण या शहरात काही बोगसगिरी करणाऱ्या लोकांची टीमने अनेक दिवसापासून कार्यरत झाली असून अनेक वाद असेलल्या जमिनी रजिस्टरी ऑफिस ला हाताशी धरून करून घेतल्या गेले त्यामुळे भू माफिया व अधिकारी यांची काही मिली भगत तरी नाही का असा प्रश्न जनतेला पडला आहे.

नगर पालिकेत काही दिवसापूर्वीच बोगस गावठाण प्रमाणपत्र देऊन रजिस्टरी केल्याचा प्रकार उघडकीस आला यात काही पाच सहा कर्मचाऱ्यांवर गुन्हे पण दाखल करण्यात आले तरी पण अनेक वाद असलेल्या क्षेत्राचे प्रकरण अगदी सोईस्कर पने नियमात बसवून रजिस्टरी केली जात असल्याने भविष्यात आणखी काही घोटाळा घडला तर त्याला जबाबदार कोण? रजिस्ट्री करण्यापूर्वी सदरच्या दस्तची चौकशी करून ती नियमात आहेत का हे पाहण्याची जबाबदारी त्या विभागाची असते पण इथे नियम बाजूला का सोडत आहेत हे मात्र एक कोडे बनले आहे.शासनाचे वेळापत्रक जाहीर आहे तरी देखील रात्री सात ते आठ वाजे पर्यंत देखील काही रजिस्ट री करण्यात आले त्यामुळे यात दोष कोणाचं तसेच सरळ आणि नियमात बसणारे दस्त नोंदणी असतील तर शासनाची वेळ संपल्या वर का केल्या जात आहे याची चौकशी करून येणाऱ्या काळात तरी जमिनीचे घोटाळे होऊ नयेत यासाठी कलेक्टर साहेबांनी लक्ष घालणे गरजेचे बनले आहे. मागच्या काळात जे बोगस रजिस्टरी झालेली आहेत ती प्रकरण न्यायालयात चालू आहे येणाऱ्या काळात तरी असे प्रकार घडू नयेत यासाठी कलेक्टर साहेबांनी वेळीच लक्ष घालून मागील वर्षभरात सायंकाळची शासनाची वेळ संपल्या नंतर जे दस्त नोंदणी केले त्याची तपासणी करून भू माफिया व त्यांच्या शी मिलीभगत असणाऱ्या कायदेशीर कारवाई करून कायद्याचा धाक दाखवून देणे गरजेचे बनले आहे.धर्माबाद शहरातील वादग्रस्त असलेल्या गटांच्या रात्रीच्या वेळी अंधारात केलेल्या रजिस्टरी तसेच अनेक बोगस रजिस्टरी संदर्भात माहिती अधिकार संरक्षण समिती तालुका अध्यक्ष सौ मीना राजू भद्रे यांनी आवाज उठवला असून यावर चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेब यांनी दिले आहे. त्यामुळें जमिनीच्या घोटाळ्या चा पार्ट टू लवकरच उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# हभप मोरेश्वर बुवा जोशी (चर्होलीकर) यांच्या काल्याच्या व पाऊल घडीच्या किर्तनाने भाद्रपद गणेशोत्सवाची सांगता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती | प्रतिनिधी**

भाद्रपद गणेशोत्सव काळात अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री महागणपतीच्या मुक्तद्वार दर्शनाचा लाखो भाविकांनी लाभ घेतला असून हभप मोरेश्वर बुवा जोशी (चर्होलीकर) यांच्या काल्याच्या व पाऊल घडीच्या किर्तनाने व मानकरी बिदागी वाटप करून भाद्रपद गणेशोत्सवाची मोठ्या भक्तिमय वातावरणात सांगता झाली. अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर पाटील व सचिव तुषार पाचुंदकर पाटील यांनी सांगितले.



या भाद्रपद गणेशोत्सवासाठी देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर पाटील, मुख्य विश्वस्त ओमकार देव ,उपाध्यक्ष संदीप दौंडकर,सचिव तुषार पाचुंदकर पाटील, खजिनदार विजय देव, पुजारी महेश कुलकर्णी,प्रसाद कुलकर्णी व मकरंद कुलकर्णी, व्यवस्थापक बाळासाहेब गोरे, व्यवस्थापक पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे व देवस्थान कर्मचारी आदींनी विशेष परिश्रम घेतले. प्रथा परंपरेनुसार श्रींना अभिषेक, सहस्रावर्तने, चार द्वारयात्रा, सनई वादन, सांप्रदायी आरत्या, भजनी मंडळाचा कार्यक्रम, भाविकांची दंडवते इत्यादी भाद्रपद गणेशोत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट यांनी आयोजन केलेले होते. भाविकांसाठी लागणा–या आवश्यक सुविधा त्यामध्ये पिण्याचे पाणी, मोफत महाप्रसाद, सुसज्ज दर्शन रांग, प्राथमिक आरोग्य केंद्र रांजणगाव गणपती यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी इत्यादी सुविधा तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रांजणगाव पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यात्रा काळामध्ये मंदिर व परिसरात आकर्षक फुलांची सजावट व नेत्रदीपक विद्युत रोषणाई भाविकांसह पुणे नगर महामार्गावरून येणार्या जाणा–यांचे लक्ष वेधून घेत होती.देवस्थान चे जनसंपर्क अधिकारी रमाकांत शेळके उपस्थित भाविकांचे स्वागत,निवेदन व माहिती देत होते.

# गणेशोत्सव मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार ॲक्शन मोडवर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**


दि. ११ रोजी बुलढाणा जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी सिंदखेड राजा तालुक्यामध्ये शांतता समितीची बैठकी घेतली यामध्ये त्यांनी गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्रेत्यावर कठोर कठोर कारवाईचे संकेत दिले त्या दृष्टिकोनातून ठाणेदारांनी आपला दणका दाखवण्यास सुरुवात केली असून तालुक्यातील किनगाव राजा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विनोद नरवाडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे अप्पर पोलीस अधीक्षक महामुनी त्याचबरोबर उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरखेड व वर्दडी बु . तांडा येथे मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अवैध हातभट्टी दारू विक्रेत्यावर छापा टाकला,यामध्ये राम जेमा राठोड यांच्याकडे १३ लिटर हातभट्टीची दारू मिळून आली , तर पुतळाबाई श्रीराम चव्हाण या दारू विक्रेत्या महिलेजवळ हातभट्टीची दारू बनवण्याकरता लागणारा २५ लिटर मोहा सडवा मिळून आला ,त्यामुळे किनगाव राजा पोलीस स्टेशनमध्ये दोघाविरुद्ध अप नं . २०० , २०१ / २४, क ६५ इम दाका प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे, सदर पथकामध्ये पोलीस निरीक्षक विनोद नरवाडे ,पोलीस उपनिरीक्षक युवराज राठोड,पोलीस हेड कॉन्स्टेबल रमेश गोरे,पोलीस शिपाई सुभाष गीते,पोलीस शिपाई अब्दुल परसू वाले,पोलीस शिपाई सलीम परसुवले,अतिश सवडे, महिला पोलीस शिपाई श्रीमती अनुराधा दुडियार गृह रक्षक दलाचे सलीम पठाण गजानन बुरे , खरात,यांचा समावेश होता,पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रमेश गोरे करीत आहेत .


# वालसावंगीत भीषण अग्नितांडव,लाखोंचे नुकसान,किराणा माल फळांचे गोडाऊन,राहते घर,दोन दुचाकी,हॉटेल जळून खाक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी | कौतिक हिवाळे**

वालसावंगी येथे बुधवारी(ता.११)ला मध्यरात्री बाराच्या सुमारास वालसावंगी पारध मुख्य रस्त्यावर जुन्या बसस्थानक भागात भीषण अग्नितांडव बघायला मिळाले.अचानकपणे लागलेल्या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून यामध्ये किराणा माल,फळाचे गोडाऊन,राहते घर,घरातील साहित्य,दोन दुचाक्या अन हॉटेल जळून खाक झाली आहे.आगीची दाहकता प्रचंड असल्याने आगीवर नियंत्रण उशिरा मिळाले.सविस्तर बातमी अशी की रात्री बाराच्या सुमारास युवक अमरनाथ हिवाळे यांना फळांचे व्यापारी बब्बू बागवान यांच्या फळांच्या मोठ्या गोडाऊनला आग लागली असल्याचे दिसले.त्यांनी तात्काळ यांची माहिती आजूबाजूला दिली.त्यावेळी आग रोद्ररूप धारण करत होती.अनेकांनी यावेळी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र आग आटोक्यात यायच्या ऐवजी अधिक वाढत गेली.या गोडाऊन शेजारीच असलेल्या व रोजमजुरी करून पोट भरणाऱ्या संदीप नवले यांच्या घरात पत्राच्या शेडमध्ये ही आग ही आग शिरली कसाबसा हे कुटुंब जीव वाचवत घराबाहेर पडले मात्र आगीत त्यांचा संसार भस्म झाला.घरातील सर्व संसारपयोगी साहित्य,





दाळदाना,सर्व जळले शिवाय घराच्या अंगणात उभ्या असलेल्या दोन दुचाकी जळून खाक झाली.बाजूलाच ज्ञानेश्वर नवले यांच्या हॉटेलमध्ये ही आग शिरली त्यामध्ये हॉटेलचे साहित्य आगीत जळून खाक झाले.गोडाऊनच्या बाजूलाच सचिन किराणाचे मालक ज्ञानेश्वर शिरसाठ यांच्या किराणा मालाच्या स्टॉक मध्ये देखील आगीचे लोळ जाऊन त्यांचा किराणा माल देखील जळून खाक झाला आहे.रात्री उशिरा ही आग आटोक्यात आली मात्र तोपर्यंत सर्व जळून खाक झाले होते.दरम्यान घटनास्थळी अग्निशामक दलाची गाडी आली शिवाय ग्रामस्थानी देखील आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.या दुदैवी घटनेत बब्बू बागवान यांचे गोडाऊन जळून १८ लाखाचे,दुकानदार ज्ञानेश्वर शिरसाठ यांचे किराणा स्टॉक सामायन जाळुन ८ लाख,संदीप नवले यांचे घर व दुचाकी जळून ७ लाख,तर ज्ञानेश्वर नवले यांचे हॉटेलचे २ लाख रुपयांचे तर दुचाकी जळून १ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.दरम्यान या घटनेचा तलाठी अमोल जाधव,बिट जमादार प्रकाश शिनकर यांनी पंचनामा केला असून आगीचे कारण मात्र समजू शकले नाही.या प्रकरामुळे गावात मात्र भीतीचे वातावरण होते.

**मोठा अनर्थ टळला:**आग जर आटोक्यात आली नसती तर प्रचंड मोठा अनर्थ घडला असता घरातील कुटुंब,कुटुंबाचे छोटे मोठे सदस्य आगीच्या तावडीत सापडले असते मात्र पोलीस कर्मचारी,ग्रामस्थ यांनी वेगवान हालचाली करत आग रोखली.ग्रामस्थांनी देखील रस्तावरील वाहने लगेच बाजूला केले शिवाय गॅसच्या टाक्या घराबाहेर काढल्या.एकूणच मोठी भीषण परिस्थिती रात्री उदभवली होती.शिरसाठ यांच्या तीन मजली इमारतीपर्यंत हे आगीचे होळ पोहचले होते यावरूनच अंदाज येतो की परिस्थिती किती भयानक होती ती.

**अनेकांनी दिला मदतीचा हात:**या भीषण अग्नितांडवात सर्वांचे मोठे नुकसान झाले असून त्यांना शासनाकडून मदत मिळेल ती मिळेल मात्र गावातील ग्रामस्थांनी हाती झोळी घेत गावातून मदत फेरी काढली.गावातील व्यापारी,पतसंस्था,बँका,ग्रामस्थ यांना मदतीचे आवाहन केले त्यांनी देखील माणुसकी धर्म जोपासत त्या कुटूंबाला मदत केली असून जवळपास साठ ते सत्तर हजार रुपये आज जमा करण्यात आले.काल संपूर्ण रात्र देखील ग्रामस्थ घटनास्थळी हजर होते.मिळेल ती मदत करत होते...

दरम्यान माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी घटनास्थळी भेट देत तहसीलदार,तलाठी यांना या कुटुंबाना तात्काळ मदत मिळवून देण्याची सूचना दिली.शिवाय खासदार डॉ.कल्याण काळे यांनी सुद्धा याबाबत तहसीलदार संतोष बनकर यांच्याशी संपर्क साधला असून योग्य ती कार्यवाही करण्याचे सांगितले आहे.

# नांदेड लोकसभा पोटनिवडणुक जिंकण्यासाठी मारोतराव कवळे गुरुजी शिवाय नाही पर्याय अन्यथा भाजपाची सिट धोक्यात

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

लवकरच महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर होणार आहे.विधानसभेच्या निवडणुकीसोबत लोकसभेची पोटनिवडणुक पार पडणार आहे.या होणाऱ्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाला आत्ता उमेदवार निवडी बाबत फेरविचार करावा लागणार असुन गत निवडणुकीत दुधाने पोळलेल्या पक्षाला आता ताकही फुंकुन पिण्याची वेळ आली असल्याचे बोलले जात असले तरी यासाठी भाजपाला एक सक्षम पर्यायाची चाहुल लागल्याचे विश्वसनिय सुत्रांकडून माहिती पुढे आली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे आहे की, लोकसभेच्या सार्वत्रीक निवडणुकीत नांदेड लोकसभा मतदार संघात भाजपाचा दारुण पराभव करत कांग्रेसने मोठ्या मताधिक्याने बाजी मारली. परंतु कै.खा.वसंतराव चव्हाण यांना खासदार म्हणुन निवडुन येउन ३ महिन्याचा कालावधी उलटला व काळाने त्यांच्यावर झडप घातली व त्यांच्या प्रकृतीने दगा दिल्याने त्यांचा स्वर्गवास झाला. यात नांदेड लोकसभेची जागा रिक्त झाली. रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणुक होणार असुन यासाठी भाजपाला एक सक्षम उमेदवार नायगाव परिसरातील मारोतराव कवळे गुरूजी असल्याचे भाजपाप्रेमी जाणकाराचे मत आहे.तसेच काँग्रेस पक्षाचे प्रा.रविंद्र वसंतराव पाटील चव्हाण आमदार व्हावेत अशी नायगाव परिसरातील नागरिकांची ईच्छा आहे.आणि खासदार नायगाव परिसरातील झाल्यावर दुधात साखर टाकल्यासारखे होईल अशी अपेक्षा नायगाव च्या जनतेची आहे.नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपास सक्षम पर्याय म्हणजे लोकाभिमुख शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजीच होऊ शकतात असे भाजपाच्या एका गोटातुन बोलले जात आहे. कवळे गुरुजी हे नांदेड लोकसभेमधुन भाजपाला विजयश्री खेचुन आणण्यासाठी कवळे गुरूजी यशस्वी ठरु शकतात असे मतदारसंघात सध्या चर्चा चालू आहे.

नायगांव विधानसभा तसेच नांदेड लोकसभा मतदार संघात गुरुजी यांच्या विकास कार्याच्या चर्चेमुळे कवळे गुरुजी संपुर्ण जिल्ह्यातील मतदार संघात सुपरिचीत झाल्याचे अनेकांचे म्हणने आहे.उमरी तालूक्यातील सिंधी या गावी एका शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले मारोतराव कवळे गुरुजी हे कुठलाही धाडसी निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्या अंगी असलेले नेतृत्व आहे. कवळे गुरूजी यांनी जिल्हा परिषदेवर निवडुण येऊन उमरी,धर्माबाद व नायगाव तालुक्यातील अनेक गावात विकासाची कामे केले असून,उमरी बाजार समितीचे उपसभापती,सभापती म्हणूनही काम केलेले आहे.विधानसभा निवडणूक पण लढवली होती.माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थित प्रदेश कार्यालयात पक्ष प्रवेश केलेला आहे. गेल्या लोकसभेला भाजप पक्षाकडुन एकनिष्ठ काम करत आख्खा जिल्हा पिंजुन काढले होते.विकासात्मक काम करण्याची त्यांची पध्दत जणु काही वेगळीच आहे.स्वच्छ राजकारण सर्वांना सोबत घेऊन जनतेसमोर



जाणारे कवळे गुरूजी हे लोकसभेचे विजयाचे शिल्पकार ठरु शकतात असे जनतेतुन चर्चा पुढे येत आहे. मारोतराव कवळे गुरुजी शेतकऱ्याचा मुलगा असल्याने पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे नांदेड जिल्हातील शेतकरी आर्थिक बाजुने सक्षम झाला पाहिजे उमरी धर्माबाद नायगाव सह जिल्हात सिंचनाची सोय झालीं पाहिजे अशी त्यांची इच्छा आहे दररोज नऊशे मेट्रिक टन ऊस गाळप झाला पाहिजे म्हणून शिंधी येथे गुळपावडर कारखाना काढला, शेतीला जोडव्यवसायाच्या माध्यमातून दुग्धव्यवसाय वाढला पाहिजे शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळता राहिला पाहिजे याउद्देशातुन जिल्हातील शेतकऱ्यांना कै.व्यंकटराव पाटील कवळे पतसंस्थेकडुन गाईम्हैशी वाटप करण्यात आले आहे.या भागात ऊसाच्या क्षेत्रांत वाढ झाली म्हणून उमरी तालुक्यातील कुसूमनगर वाघलवाडा साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून हा कारखाना कवळे गुरूजीना माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब यांनी कवळे गुरूजींना कारखाना देऊन टाकला.अजून ऊसाचे क्षेत्रात वाढ झाली.पर्याने आशिया खंडातील मोठा तिसरा नवीन कै.शंकरराव चव्हाण जागरी गुळपावडर कारखाना उभारणी करुन तिन्ही कारखाने सक्षम चालून ऊस लागवड करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम केले आहे.कवळे पतसंस्थेच्या माध्यमातून जिल्हात २० शाखा काढुन त्या त्या तालुक्यातील शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम कवळे गुरूजी करीत आहेत. शाळा,कारखाने,दुधडेअरी,पतसंस्था इत्यादींच्या माध्यमातून जवळपास ५५०० कर्मचारी काम करीत आहेत. ऐवढ्यावरच न थांबता ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीचा भाव मिळेल यासाठी पुढे भविष्यात सोयाबीन प्लँट, इथेनॉल सारखे प्रोजेक्ट काढण्याचा मानस कवळे गुरूजीचा आहे.धर्माबाद व नायगाव तालुक्यात एमआयडीसी सारखे उद्योग उभारून येथील सुशिक्षित बेरोजगार तरुण, शेतकरी,शेतमजूर आधीना न्याय देतीलच व्यापारपेठ वाढेल.भागात उद्योग उभारल्याने त्यांचे या धाडसी निर्णयामुळे उमरी तालूक्यासह आसपासच्या परिसरातील असंख्य तरुण कामाला लागले आहेत. शेतकरी बांधवांविषयी अपुलकी असलेला त्यांचे जीवनमान गगणाला गवसणी कसे घालू शकेल असा विचार करीत त्याअनुषंगाने उद्योगांची आखणी करणारा उमदा उद्योगपती अशी कवळे गुरुजींनी जिल्ह्यात ओळख निर्माण केली आहे.असा निष्कलंक शेतकरी,शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार लोकांना न्याय देणारा आणी जिल्हात यामाध्यमातून व्यापारपेठ वाढविणारा असा एकमेव भाजप पक्षाकडुन नवीन चेहरा कवळे गुरूजी सारखा लोकसभेला उमेदवार मिळाला तर नांदेड जिल्हाची भाजप पक्षाची सीट बहुमताने लागू शकते असे राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

सहकारातुन समृध्दी कडे.कवळे गुरूजी

जिल्हात सहकार क्षेत्र कसे चालवायचे हे स्वर्गीय शंकरराव चव्हाण साहेब,कै.शामराव पाटील कदम, कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर,कै. बळवंतराव चव्हाण,गंगाधरराव देशमुख कुंटूरकर,कै.बापू बारडकर ,बाबा पाटील बन्नाळीकर यासह अनेक दिग्गज नेत्यांनी केलेली कामाचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून मारोतराव कवळे गुरूजी यांनी नांदेड जिल्ह्यात कै व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था च्या २० शाखा काढुन ते औसक्षम रित्या चालवित आहेत.विशेष म्हणजे सर्वगुणसंपन्न आणी कुठलेच वेसनाधिन नसलेले हे कवळे गुरूजी भारतीय जनता पक्षाला लोकसभेसाठी सक्षम उमेदवार आहेत त्यामुळे सर्व सामान्य जनतेतुन कवळे गुरूजीना मागणी आहे.

## बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी किसान सभेने आयोजित केलेल्या चुंबळी फाटा येथील रस्ता रोकोला जाहिर पाठींबा-शेकाप, काँग्रेस, शिवसेना(उबाठा)

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**पाटोदा । प्रतिनिधी**

सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे नुकसान झाले त्या मुळे बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहिर करुन प्रति हेक्टरी १ लाख रुपये अनुदान द्या., सन-२०२३ सालचा खरीप पिकाचा कोणत्या पिकाला किती टक्के विमा मंजुर केला तो अद्याप विमा कंपनीकडुन शेतकऱ्याला मिळाला नाही तो तात्काळ द्या., सोयाबीनला ७०००/- रुपये आणि कापसाला किमान ९०००/- रुपये हमी भाव देऊन खरेदी केंद्रे तात्काळ चालु करुन २४ तासाच्या आत शेतकऱ्यांना पैसे देण्याची शासनाकडुन तरतुद करा., गाईच्या ३.५ फॅट च्या दुधाला ४५/- रुपये प्रति लिटर व म्हशीच्या ६.०




फॅट च्या दुधाला ६५/- रुपये हमी भाव द्या., गेल्यावर्षीच्या पावसाच्या तुटीमुळे ८० ते ९० टक्के पिके उध्वस्त झाली त्या मुळे खरीप पिकात घट झाली म्हणून बँकांचे पिक कर्ज थकीत राहिले त्या मुळे बँकेने शेतकऱ्यांची खाती होल्ड केली त्या मुळे शेतकरी जास्तच आर्थिक संकटात आला. शासनाच्या कित्येक योजनेच्या लाभापासुन तो दुर राहात आहे त्या साठी शासनाने बँकेला होल्ड काढण्याचे तात्काळ आदेश द्यावेत. नसता किसान सभेने आयोजित केल्या गुरुवार दिनांक-१९ सप्टेंबर-२०२४ रोजी च्या चुंबळी फाटा ता.पाटोदा, जि.बीड येथील रस्ता रोकोला भारतीय शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, शिव सेना(उध्दव बाळासाहेब ठाकरे) तर्फे जाहिर पाठिंबा देण्यात येत आहे. असे लेखी निवदेनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय ता.पाटोदा जि.बीड यांचे मार्फत राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे आणि राज्याचे कृषीमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा.ना.धनंजयजी मुंडे, यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय काँग्रेसचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव व शिवसेना (उबाठा) चे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख, शिवसेनेचे शहर प्रमुख अजय डोरले, सोमिनाथ लऊळ यांच्या सह इतरांनी दिले आहे.

## उपविभागीय अधिकारी यांनी केली गणेश विसर्जन मार्गाची पाहणी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

तूच सुखकर्ता तूच दुःखहर्ता अवघ्या दीनांचा नाथा बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे चरणी ठेवितो माथा. याप्रमाणे गणरायाची स्थापना घरोघरी करण्यात आली आहे.. गणरायाचे आगमन होताच प्रशासन सुद्धा नागरिकांना कुठल्याही अडचणीचा सामना पडता कामा नये म्हणून खबरदारी घेत असतात. सिंदखेड राजा येथे उपविभागीय अधिकारी यांनी सिंदखेड राजा मधील सार्वजनिक गणेश विसर्जन मार्गाची पाहनी केली. राजे लखोजीराव यांच्या राजवाड्यापासून या पाहणी दरम्यान त्यांच्यासोबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते. या पाहनी दरम्यान उपविभागीय अधिकारी यांना काही ठिकाणी



विद्युत वाहिनीच्या तारा खाली लोमकळलेल्या दिसल्या त्या दुरुस्त करण्याच्या सूचना महावितरण कर्मचारी यांना दिल्या. तसेच काही ठिकाणी स्वच्छता करण्याचे आदेश सुद्धा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी प्रशासनांला दिले .आनंद, उत्साह आणि भक्तीभावाच्या वातावरणात, व पर्यावरण पूरक गणेशोत्सव आपण सर्वजण या उत्सवात सहभागी होऊन आनंदाची उधळण करुया असे आवाहन उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांनी केले.

## वीर राजे ग्रुप गणेशोत्सव मंडळा कडून भव्य रक्तदान शिबीर संपन्न



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक ११/०९/२०२४ रोजी सौताडा येथील वीर राजे ग्रुप गणेशोत्सव मंडळाकडून भव्य सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक रक्तदात्यांनी या वेळी रक्तदान शिबिरामध्ये आपले रक्तदान केले. एकूण ४१ रक्तदात्यांनी आपले बहुमूल्य असे रक्तदान केले. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी प्रसिद्ध असलेले वीर राजे ग्रुप यांच्या गणेशोत्सव मंडळा कडून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांपैकी हा रक्तदानाचा उपक्रम हा अतिशय स्तुत्य असून ज्या वेळी एखाद्या व्यक्तीचा अपघात होतो व त्याला रक्ताची अत्यंत गरज भासते त्या वेळी रक्त हे जीवनदान म्हणून रक्ताची गरज म्हणजे एक प्रकारचं वरदान ठरते, हे सामाजिक भान ठेवून मंडळाचे क्रियाशील कार्यकर्ते अर्जुन भोरे, विशाल कुमटकर, बबलू टेकाळे, पांडू टेकाळे, सागर टेकाळे, बाबू शिंदे, भाऊ शिंदे, सुग्रीव टेकाळे, बाबू टेकाळे, व्यंकटेश टेकाळे, राम शिंदे, अमोल शिंदे, संतोष शिंदे, जीवन टेकाळे, सोमीनाथ कुमटकर, दत्तात्रय टेकाळे, विशाल शिंदे, अशोक टेकाळे, सतिष शिंदे, प्रकाश सानप, अशोक रामहारी टेकाळे, पिंटू सानप, विजय शिंदे, परसु शिंदे सह आदी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिर कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडला. सर्व स्तरातून या कार्यक्रमाचे चांगला समाज उपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल सौताडा ग्रामस्थांकडून वीर राजे ग्रुप गणेशोत्सव मंडळाचे आभार मानण्यात आले, या प्रसंगी ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून कार्यक्रमाची शोभा वाढवली व रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे हे बहुमूल्य संदेश या निमित्ताने दिला.

### माननीय उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते

## राज्यातील ४३४ आयटीआय मध्ये संविधान मंदिराचे उद्घाटन व संविधान महोत्सवाचे आयोजन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरखेड येथे संविधान मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी संविधान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीनां सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी मा. ना.मंगलप्रभात लोढा साहेब मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या संकल्पनेतून राज्यातील ४३४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये




संविधान मंदिराची स्थापना करण्यात आली आहे संविधान मंदिराचे उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती जगदीपजी धनकड साहेब यांच्या शुभहस्ते १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे त्या अनुषंगाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे दिनांक १२संप्टेंबर ते १५ संप्टेंबर या कालावधीत संविधान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे या कालावधीत संस्थेत निंबध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा, भाषण स्पर्धा ,प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे तसेच परिसरातील नामांकित संविधान अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांचे भारताचे संविधान याविषयी मार्गदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे जेणेकरून नागरिकांमध्ये, विशेषतः अपेक्षित समुदायांमध्ये घटनात्मक अधिकार आणि कर्तव्य बद्दल जागरूकता वाढवणे ,घटनात्मक समस्या, दुरुस्त्या, समकालीन समाजातील घटनेची भूमिका यासारख्या विषयातील जागरूकता, विद्यार्थ्यांना त्यांचे घटनात्मक अधिकार समजून घेण्यास किंवा त्यांचा वापर करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना कायदेशीर सहाय्य व समर्थन प्रदान करणे ,राज्यघटनेचे सखोल आकलन व्हावे यासाठी निबंध स्पर्धा व संबंधित कार्यक्रम आयोजित केले आहे यासह संविधानाच्या विविध पैलूंवर पुस्तके, लेख इत्यादी गोष्टी उपलब्ध करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्याचा व संविधानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा सदरील कार्यक्रमाचा उद्देश आहे सदरील कार्यक्रम आणि संविधान मंदिराच्या उद्घाटनासाठी परिसरातील सर्व ज्येष्ठ मंडळी ,प्रतिष्ठित नागरिक, पालक ,सर्व शाळेतील विद्यार्थी , आजी माजी प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणार्थी , सामाजिक कार्यकर्ते व संविधान प्रेमी नागरिक यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान संस्थेचे प्राचार्य श्री डीपी पवार यांनी केले आहे.

## आष्टी तालुका फोटोग्राफर्स बांधवांनी केले आदर्श गणपती विसर्जन पारंपारिक वाद्यासह बैलगाडीने वेधले आष्टीकरांचे लक्ष

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बाल वारकरी,भजनी पथक, टाळ मृदुंगाचा निनाद,आणि सजवलेल्या बैलगाडीतून गणरायाची विसर्जन शोभायात्रा या पारंपरिकतेने नटलेल्या आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या गणेश मंडळाने अश्टिकरांचे लक्ष वेधून घेतले.त्यामुळे पहिल्याच वर्षी स्थापना केलेल्या या मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शनिवारी दि.७ सप्टेंबर रोजी गणरायाची स्थापना झाल्यानंतर गौरी गणपतीच्या बरोबर अनेक बाप्पाचे विसर्जन होत असते.यामध्ये प्रथम वर्ष असलेल्या आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने आष्टी शहरात गणरायाची स्थापना करण्यात आली होती.गुरुवारी या मंडळाच्या बाप्पाची विसर्जन शोभायात्रा पार पडली.यावेळी पारंपारिक वाद्ये,सनई तसेच संत शिरोमणी नामदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था पारगाव जोगेश्वरी येथील विद्यार्थी,विद्यार्थिनी यांनी भजन,भारुड,फुगडी आदी माध्यमातून केलेले वारकरी संप्रदायाचे सादरीकरण याने सर्व अष्टिकरांचे लक्ष वेधले तर सजवलेल्या बैलगाडीतून श्रीची निघालेली शोभायात्रा यामुळे एक वेगळेच स्वरूप या विसर्जन शोभायात्रेला प्राप्त झाले होते.शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आष्टी नगरपंचायत यांच्या वतीने वारकऱ्यांसाठी चहा,नाष्ट्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती.अत्यंत देखण्या आणि पारंपारिक शोभायात्रेने आष्टीकरांची मने जिंकली.





# कोटा संघ प्रमुखा महाराष्ट्र प्रवर्तनी अत्यंत उच्च कोटीची आत्मसाधिका प.पु प्रभा कवर जी महाराज साहेब यांची दहावी पुण्यतिथी उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

महाराष्ट्र प्रवर्तिनी प .पु .प्रभा कवर जी महाराज साहेब यांची दहावी पुण्यतिथी आज दि.१०-९-२०२४ ला वर्धमान स्थानक वासी श्री संघ आणि चातुर्मास कमिटी यांच्या तत्वाघाना ने श्री गुरु गणेश मिश्री वर्ल्ड ग्रुप यांच्या वतीने मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात साजरी केली या पुण्यतिथी साठी सानिध्य मिळालेले आसाम प्रभाविका प. पु. प्रिय स्मिता श्रीजी महाराज साहेब मधुर व्याख्याने प. पु. डॉ प्रियलता श्रीजी महाराज साहेब प. पु .प्रिय दर्शना श्री जी महाराज साहेब आणि शासन दीपिका ओजस्वी वक्ता मालवा ची मुस्कुराती विरांगणा प .पु .अमित सुदाजी महाराज साहेब यांच्या मंगला चरण ने कार्यक्रमाची सुरुवात पूज्य महासती जी ने केली. यामध्ये सौ .शोभा झांबड आणि चैतन्य भक्ती मंडळाने गीतिका द्वारा प .पु. प्रभा कवर जी महाराज साहेब ला भावभिणी सुमंजली अर्पण केली. प. पु. डॉ प्रियलताजी मारा साहेब नी आदरांजली अर्पण करताना धर्मसभेमध्ये सांगितले संत आणि सैनिक दोन्हीही देशाचे सजग प्रहरी आहे सैनिक आमच्या भारत सीमावर पहारा देऊन आम्हाला सुरक्षित ठेवण्याचे कार्य करत आहे त्याचप्रमाणे साधुसंत संस्कृतीचा रक्षण करून समाजाला आत्म उन्नती कडे नेण्याचे कार्य करतात गुरुची महिमा अनंत आघाद्य आहे. ते आमच्या जीवनाचे डायरेक्टर आहे आणि आमच्या जीवनाला टर्निंग पॉईंट देतात अशा प्रकारे गुरूंनीसा होते प्रभा कवर जी महाराज साहेब या लोणारच्या होत्या आणि त्या बेदमूथा परिवाराची लाडकी लेक होती. लहानपणापासूनच संयम मध्येच मग्न असायचे लहान असतानाच संयम पथावर आरुढ होत्या १५ वर्षाच्या वयातच प .पु. मानकवर जी मरासाहेब च्या सानिध्यामध्ये बुलढाणा येथे त्यांनी दीक्षा अंगीकार केली महा सती प्रभा कवर जी यांनी महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, मध्य प्रदेश मध्ये विचरण करून जिनवाणीचा प्रचार प्रसाद केला सकल जैन समाजाची आन-बान शान कोटा संघप्रमुखाला भावांजली अर्पण केली ओजस्वी वक्ता प.पू .अमित सुद्धा जी महाराज साहेब यांनी विदुशी महासती ना आदरांजली अर्पण करत विनम्रतापूर्वक सांगितले मला संयम पथावर दृढ राहण्यासाठी ज्या ज्या गुरुवरांनी आशीर्वाद दिले त्यामध्ये प्रभा कवर जी महाराज साहेब या एक आहेत आणि त्या संघटन प्रिय होत्या त्याचप्रमाणे सांप्रदायिक एकतेच्या त्या पुजारी होत्या त्यांचा १९६५,१९६८ आणि २०१३ मध्ये लोणार चातुर्मास झाला त्यावेळेस त्यांनी सगळ्या संप्रदायांना एकत्रित करून संघटन केले ते नेहमी सांगायचे सगळ्यांना जोडण्याचे कार्य मी करत आहे समन्वय आणि एकता हेच आपला नारा आहे आणि त्या मधूनच आज लोणार सकल जैन समाज मध्ये हे एकतेचे प्रदर्शन दिसत आहे ते प्रभाकर जी महाराज साहेब यांच्या प्रेरणांनी प .पु . अमित सुधाजी महाराज साहेब यांनी लोणार जैन समाज याची प्रशंसा करत त्यांनी सांगितले प. पु. प्रभाकर जी महाराज साहेब यांची प्रेरणा येथे रत्नो ची खान आहे त्यामध्ये २७ आत्म्यांनी जैन भगवती दीक्षा ग्रहण करून समाज सुधारण्याचे कार्य करत आहे त्याचप्रमाणे स्वतःची गती सुधारली प .पु. प्रिय स्मिता जी महाराज साहेब यांनी मधुर आवाजात स्तवन सादर करून गुरुभक्तीची महिमा सादर केली प .पु .अमित सुधाजी महाराज साहेब यांच्या प्रेरणाने सभेतील दानदात्यांनी पारटेशन बोर्ड सभेत बसणे साठी ६१ खुर्ची आणि २५ बफेटेबलची दान राशी घोषित केली कार्यक्रमाचे संचालन करत भिकम चंदजी रेदासनी सरांनी प्रभाकर जी महाराज साहेब च्या जीवनपट सगळ्यांच्या समोर ठेवला प्रभा गुरूनिसा यांचा दोन घंटे जाप ची जिम्मेदारी प्रभा बहु मंडळ यांनी सांभाळली श्री गुरु गणेश मिस्त्री वर्ड ग्रुप यांच्या वतीने प्रभावना व गौतमप्रसादीचे आयोजन करण्यात आले त्याचप्रमाणे या पावन प्रसंगी श्री मदनलालजी शितल कुमारजी डुंगरवाल व गौतम चं जी शांतीलाल गेलडा यांनी प्रभावना वितरित केली श्वेतांबर मूर्ती पूजक संघ व स्थानक वासी श्री संघ तेरापंथी महासभे च्या सर्व श्रावक श्राविकांनी कार्यक्रमात उपस्थित राहून संप्रदायिक एकतेचे परिचय दिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्धमान स्थानक वासी श्रावक संघ चातुर्मास कमिटी व गुरु गणेश मिस्त्री वर्ड ग्रुपच्या सदस्यांनी भरपूर मेहनत घेतली.





# ग्रामीण भागातील विद्यार्थी सुध्दा स्पर्धा परीक्षेत चांगले यश मिळवु शकतात-भगवानराव पाचपुते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथील असणाऱ्या खेड्यात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा आणल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत आता पाठिमागे नाहीत; असे सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा चेअरमन तथा कुकडी घोड कालवा सल्लागार समितीचे सदस्य तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव पाचपुते यांनी केले आहेत. श्रीगोंदा तालुक्यातील गणेशा आनंदवाडी येथील कु. विद्या शिवाजी कोल्हटकर हिने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादित करून वैधमापनशास्त्र क्लास २ पदी निवड झाल्याबद्दल नवभारत माध्यमिक विद्यालय गणेशा आनंदवाडी येथे सत्कार प्रसंगी पाचपुते यांनी बोलताना सांगितले.

पाचपुते पुढे म्हणाले की या भागातील पुढिल शिक्षण घेण्यासाठी दूर जावे लागत होते. त्यातच काही पालकांची आर्थिक परिस्थिती नसल्याने मुलींना शिक्षण घेण्याची इच्छा असताना सुद्धा शिक्षण घेता येत नव्हते; त्यामुळे याठिकाणी माध्यमिक शाळा उघडली याच शाळेचे अनेक विद्यार्थी उच्च पदावरती स्थानापन्न झाले आहेत. याचा आज अभिमान वाटतो असे पाचपुते यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला संस्था अध्यक्ष ड.प्रतापराव पाचपुते, भास्कर जगताप, संस्था सचिव संभाजी कोकाटे, संस्था विश्वस्त रत्नमाला पाचपुते, अशोकराव भोसले,यशवंत शेजुळ, गणेश सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी कोल्हटकर मुख्याध्यापक सुनिल गिरमकर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# भ्रष्ट मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करा-डॉ.बच्छिरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे



मेहकर भ्रष्ट मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करा शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी केली राज्यपालांकडे मागणी.

मालवण मधील राजकोट किल्ल्यावर असलेला महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा याचे निकृष्ट दर्जाचे काम व त्यात आर्थिक गैरव्यवहार करून घाईगडबडीत त्याचा राजकीय फायदा उचलण्यासाठी अनावरण करून घेणारे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांचा राजीनामा घेऊन यांच्यावर तत्काल कार्यवाही करण्यात यावी हा फक्त छत्रपतींचा अपमान नाही तर हा संपूर्ण भारताचा अपमान आहे व या अपमानाची शिक्षा मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व गृहमंत्री जे यात दोषी आहेत यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन मेहकर विभागीय उपाधिकारी यांच्यामार्फत राज्यपालांना देण्यात आले याप्रसंगी शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांच्यासह नगरसेवक गजानन जाधव, शहर उपप्रमुख लुकमान कुरेशी युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर किसनराव आघाव गणेश पाठे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त जिल्ह्यात स्वच्छता अभियान राबवुन एक आदर्श घडवावे स्वच्छतादूत पंजाबराव लहाने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे

जाफराबाद तालुक्यातील म्हसरूळ येथील स्वच्छताधुत श्री पंजाबराव भुजंगराव लहाने यांनी बोलताना सांगितले की मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्ह्यात तालुक्यात गावागावात स्वच्छता अभियान राबवून घनकचरा स्वच्छता करून गाव स्वच्छ सुंदर करण्यासाठी श्रमदानाची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त शिपाई स्वच्छता धुत श्री पंजाबराव भुजंगराव लहाने यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत सांगितले आहे या १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने गाव परिसर स्वच्छ करून सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रोगराई मुक्त होऊ शकते सध्या विहीरीना नवीन पाणी आले असल्याने त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना साथीचे आजार होऊ शकते यासाठी गाव परिसर स्वच्छता अभियान राबविणे काळाची गरज असल्याचे मत स्वच्छतादुत श्री लहाने यांनी शेवटी बोलताना सांगितले

# सौ.पुजाताई पाटील कवळे (जाधव) यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड जिल्हाचे व नायगाव विधानसभा मतदार संघांचे लोकप्रिय शेतकरी नेते मा. मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झालेल्या व्यंकटराव पाटील कवळे विद्यालय कुसुमनगर वाघलवाडा. ता. उमरी जि. नांदेड येथील शाळेत दि १२/०९/२०२४ रोजी व्हि. पी. के उद्योग समुहाच्या संचालिका मा. सौ. पुजाताई पाटील कवळे-जाधव यांचा वाढदिवस शालेय विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून हर्ष उल्लासात, आंनदी वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी मा. मारोतराव पाटील कवळे गुरुजी (चेअरमन व्ही.पी. के उद्योग) लक्ष्मण पा. हरेगावकर,आंबटवार साहेब, यू जी कदम सर येडांळे साहेब , वाडियार साहेब,अंबरते साहेब, भिसे साहेब, शेख साहेब, रफिक साहेब, वाघ साहेब, उमाटे साहेब, उमरे साहेब शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या निवासस्थानी गौरी पूजन व महानैवेद्य

## भाग्यश्री निवासस्थानी गौरी-गणपतीची आकर्षक आरास



इंदापूर येथे भाग्यश्री निवासस्थानी गौरी-गणपती पूजन प्रसंगी हर्षवर्धन पाटील, भाग्यश्री पाटील,अंकिता पाटील-ठाकरे,राजवर्धन पाटील व मान्यवर.

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

इंदापूर येथे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या भाग्यश्री निवासस्थानी जेष्ठा गौरी पूजनाचा विधी व महानैवेद्याचा कार्यक्रम बुधवारी (दि.११) उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाला. दरम्यान,भाग्यश्री निवासस्थानी गौरीची आकर्षक सजावट करून पर्यावरण पूरक असा सुंदर देखावा साकारण्यात आला होता.

हर्षवर्धन पाटील यांच्या घरी परंपरेनुसार गौरी-गणपतीचा उत्सव मोठ्या प्रमाणावरती विधिवत पद्धतीने साजरा केला जातो.भाग्यश्री निवासस्थानी गौरीचे मंगळवारी आगमन झाल्यानंतर इंदापूर तालुका जिजाऊ महिला बचत गट असोसिएशनच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील,पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या अंकिता पाटील-ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गौरीची आकर्षक सजावट व पर्यावरण पूरक सुंदर देखावा साकारण्यात आला होता.तसेच गौरी पूजनानिमित्ताने बुधवारी गौरी-गणपतीचे पूजन,महानैवेद्य व आरती आदी विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाले.याप्रसंगी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, श्रीमती सुमन झांबरे,भाग्यश्री पाटील,निहार ठाकरे,अंकिता पाटील-ठाकरे, राजवर्धन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

गौरी पूजनच्या निमित्ताने भाग्यश्री निवासस्थानी महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम भाग्यश्री पाटील अंकिता पाटील ठाकरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.तसेच बुधवारी सायंकाळी शेकडो महिला व नागरिकांनी गौरी-गणपतीचे दर्शन घेतले व प्रसादाचा लाभ घेतला.या सर्वांचे हर्षवर्धन पाटील, भाग्यश्री पाटील,अंकिता पाटील-ठाकरे,राजवर्धन पाटील यांनी स्वागत केले.दरम्यान,गौरी-गणपती पूजनच्या निमित्ताने भाग्यश्री निवास्थान बुधवारी सायंकाळी महिला व नागरिकांच्या गर्दीने फुलून गेले होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904